पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६४ ■ रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# जिल्ह्यात पाच पैकी तीन नगरपरिषदेवर भाजपचा झेंडा....

## मूर्तिजापूर व बार्शिटाकळी वंचित तर बाळापूर काँग्रेसच्या ताब्यात





प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अकोला :** जिल्ह्यात पाच नगरपरिषदसह एका नगरपंचायतच्या निवडणुकीचा निकालात भाजपने जोरदार मुसंडी मारत आपली ताकद दाखवून दिली आहे. अकोट, तेल्हारा आणि हिवरखेड या तब्बल तीन नगरपरिषदेवर भाजपचा नगराध्यक्ष निवडून आला आहे. तसेच बार्शिटाकळी नगर पंचायत व मूर्तिजापूर नगर परिषदेवर वंचित बहुजन आघाडी तर बाळापूर नगरपरिषद काँग्रेसने बाजी मारली आहे.

जिल्ह्यात बाळापूर वगळता अकोट, हिवरखेड, तेल्हारा, बार्शिटाकळी आणि मूर्तिजापूर या नगरपरिषद व नगर पंचायतची निवडणून २ डिसेंबरला पार पडली होती तर बाळापूर नगरपरिषदेची निवडणूक २० डिसेंबरला पार पडली. या निवडणुकीची मतमोजणी आज होऊन त्यात भाजपने पुन्हा एकदा धक्कातंत्राचा परिचय देत अकोट, तेल्हारा व हिवरखेड नगर परिषदेवर आपला झेंडा फडकावला आहे. यात अकोटमध्ये झालेल्या चुरसीच्या लढतीत माया विवेक धुळे यांनी बाजी मारली. हिवरखेड नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदावर भाजपच्या सुलभा रमेश दुतोंडे विजराजमान होणार असून, त्या हिवरखेडच्या पहिल्या नगराध्यक्ष ठरणार आहेत, हे विशेष. तेल्हारा नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदावर भाजपच्याच वैशाली जितेंद्र पालीवाल ह्या निवडून आल्या आहेत. या व्यतिरिक्त बार्शिटाकळी नगर पंचायतवर वंचित बहुजन आघाडीच्या अख्तर खातून अलिमुद्दीन ह्या विजयी झाल्या आहेत. मूर्तिजापूर नगरपरिषदेत वंचित बहुजन आघाडीचे शेख इमरान हे आघाडीवर होते. तसेच बाळापूर नगर परिषेदवर काँग्रेसच्या डॉ. आफरीन मोहम्मद जमिर यांनी आपले वर्चस्व राखत नगराध्यक्ष पदावर निवडून आल्या आहेत.

### भाजपची हॅट्ट्रिक

अकोट नगर परिषदेच्या मतमोजणीत सुरूवातीच्या फेरीपासून एमआयएमच्या फिरोजाबी राणा आघाडीवर होत्या तर दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेसच्या अलका बोडखे आणि तिसऱ्या क्रमांकावर भाजपच्या माया धुळे होत्या. मात्र त्यांनी शेवटच्या फेऱ्यांमध्ये अनपेक्षितपणे जोरदार मुसंडी मारत एमआयएमच्या राणा यांचा ३५०० मतांनी पराभव करीत नगराध्यक्ष पदावर आपला दावा ठोकला आहे. अकोट नगर परिषदेत भाजपने सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळविली आहे.

# आकाश फुंडकरांना मोठ यश !


## रजत नगरी खामगावात फुलले कमळ नगराध्यक्षपदी अपर्णा सागर फुंडकर

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**खामगाव:** अकोला चे पालकमंत्री तसेच खामगावचे आमदार आकाश फुंडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने खामगावात दणदणीत यश प्राप्त केले आहे, भाजपाच्या झंजावाता पुढे सर्वच पक्ष पार भुईसपाट झाले.

भाजपाने नगरसेवकांच्या १८ पैकी १७ जागा जिंकत एक हाती वर्चस्व स्थापित केले. तर खामगावच्या नगराध्यक्षपदी भाजपाच्या सौ अपर्णाताई फुंडकर यांनी काँग्रेसच्या स्मिता किशोर भोसले यांचा पराभव केला. सौ अपर्णाताई फुंडकर यांना २५ हजार ६५४ मते मिळाली तर त्यांच्या प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या स्मिता भोसले यांना १४,८८५ मते प्राप्त झाली, निवडणुकीचा निकाल घोषित होताच भाजपा कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत एकच जल्लोष केला जय श्रीराम च्या जय घोषाने संपूर्ण रजत नगरी खामगाव फुलून गेली होती.

संपूर्ण अकोला व बुलढाणा जिल्ह्याचे लक्ष खामगाव नगरपालिकेच्या निवडणुकीवर लागले होते आकाश फुंडकर यांच्या वहिनी अपर्णाताई फुंडकर यांना नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत उतरवल्याने विरोधकांनी घराणेशाहीचा आरोप केला होता परंतु या सर्व आरोपांना पुरून उरित आकाश फुंडकर



यांनी भाजपाचे निर्विवाद वर्चस्व खामगावात साबित केले १८ पैकी १७ जागी त्यांनी भाजपाचे उमेदवार निवडून आणीत खामगाव हा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे परत एकदा साबित केले, सर्व विजयी उमेदवारांची शहरात विजय रॅली काढण्यात आली गुलाल उधळीत व ढोल ताशाच्या आवाजावर नृत्य करीत भाजपा कार्यकर्त्यांनी आपला विजय साजरा केला.



# नवी मुंबईत भाजपवर घराणेशाहीचे आरोप; कार्यकर्त्यांमध्ये असंतोष

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू असताना भारतीय जनता पक्षावर (भाजप) आयाराम-गयाराम आणि घराणेशाही जपण्याचे आरोप होत आहेत. एकेकाळी घराणेशाहीविरोधात आक्रमक भूमिका घेणाऱ्या भाजपने नाईक कुटुंबाला पुन्हा पक्षात स्थान दिल्याने पक्षांतर्गत तसेच राजकीय वर्तुळात तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

नाईक कुटुंबाला भाजपमध्ये प्रवेश दिल्यानंतर आमदार संदीप नाईक यांना नवी मुंबई जिल्हाध्यक्षपद देण्यात आले. पुढे बेलापूर विधानसभा मतदारसंघातील तिकीट नाकारल्यानंतर संदीप नाईक यांनी आपल्या पक्षातील आमदारावर सार्वजनिक टीका केली होती. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मधून निवडणूक लढवली होती. अशा पार्श्वभूमीवर पुन्हा त्यांना भाजपमध्ये सामावून घेण्यात आल्याने भाजपची भूमिका विरोधाभासी असल्याचा आरोप केला जात आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते एकीकडे भाजप आयाराम-गयाराम राजकारणावर टीका करत असताना दुसरीकडे वारंवार पक्षांतर करणाऱ्या नेत्यांना महत्त्वाची पदे दिली जात असल्याने तळागाळातील जुने कार्यकर्ते नाराज झाले आहेत. 'घराणेशाहीविरोधातील भाजपची भूमिका केवळ भाषणापुरतीच मर्यादित राहिली आहे,' अशी टीका विरोधकांकडून होत आहे. दरम्यान, नवी मुंबईतील महायुतीमध्येही तणाव वाढत असल्याचे संकेत मिळत आहेत.

# मविआत बिघाडी; भाजप व ठाकरे सेनेविरोधात काँग्रेस मैदानात !

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**मुंबई :** महाविकास आघाडीसोबत 'मनसे नकोच' यावर ठाम राहत अखेर काँग्रेसने मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्धार केला आहे. 'एकला चलो रे'चा नारा देत काँग्रेसने भाजप व ठाकरे बंधुंविरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शनिवारी काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढणार असल्याचे जाहीर केले. राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकीची घोषणा झाल्यापासून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महायुतीची जागावाटपावर चर्चा सुरू असून मविआत मात्र बिघाडी झाली आहे. महाविकास आघाडीसोबत मनसेला घेण्यास काँग्रेस पक्षाने सुरुवातीपासून विरोध दर्शवला होता. तरीही भाजपचा पराभव करण्यासाठी महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढावे, अशी साद मविआच्या नेत्यांनी काँग्रेसला घातली होती. मात्र, काँग्रेसने मनसेसोबत जाण्यास स्पष्ट नकार देत मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेस, महायुती आणि महाविकास आघाडीत सामना रंगणार आहे.

राज्यातील महापालिकांच्या निवडणुकींचे बिगुल वाजल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असून, १६ जानेवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहेत.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला हे सध्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. मुंबईत झालेल्या बैठकीनंतर रमेश चेन्नीथला यांनी आगामी निवडणूक स्वबळावर लढणार असल्याची माहिती दिली.

मुंबई महापालिकेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून, मुंबईचा हवा तसा विकास झालेला नाही. त्यामुळे आम्ही स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे.

भाजप आणि ठाकरेंच्या शिवसेनेविरोधात लढण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला आहे. या लढाईत सच्चे देशभक्त आणि धर्मनिरपेक्ष लोकांनी आमच्यासोबत यावे. आमच्या हातात सत्ता आल्यानंतर आम्ही मुंबई महापालिकेचा कारभार चांगल्या पद्धतीने सांभाळू. आम्ही

# चीनने भारताविरोधात WTOचे दार पुन्हा ठोठावले !

वृत्तसंस्था २१ डिसेंबर

**नवी दिल्ली :** भारत आणि चीन यांच्यातील व्यापारी तणाव पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला आहे. चीनने भाराताविरोधात जागतिक व्यापार संघटनाकडे नवीन तक्रार दाखल केली असून, माहिती व संचार तंत्रज्ञान क्षेत्रातील आयात शुल्क आणि सौरऊर्जा क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या सब्सिडीवरून हा वाद उफाळून आला आहे.

ही तक्रार शुक्रवारी चीनच्या वाणिज्य मंत्रालयाद्वारे नोंदवण्यात आली. चीनच्या वाणिज्य मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे की, भारताने स्वीकारलेली धोरणें ऊध्च्या नियमांचे उल्लंघन करणारी आहेत. विशेषतः नॅशनल प्रिन्सिपल या तत्वाचे उल्लंघन होत असल्याचा आरोप चीनने केला आहे. चीनच्या म्हणण्यानुसार, भारताच्या धोरणांमुळे देशांतर्गत उद्योगांना अनुचित स्पर्धात्मक

# लाचप्रकरणात लेफ्टनंट कर्नल अटकेत, घरात सापडलं कोटींचं घबाड

वृत्तसंस्था २१ डिसेंबर

**नवी दिल्ली:** संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण उत्पादन विभागात कार्यरत असलेला लेफ्टनंट कर्नल दीपककुमार शर्मा याला बेंगळुरू येथील कंपनीकडून तीन लाख रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) शनिवारी अटक केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

शर्मा याच्या दिल्लीतील निवासस्थानी घेतलेल्या झडतीत, सीबीआयने तीन लाख रुपये लाचेची रक्कम आणि अतिरिक्त २.२३ कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त केली.


संरक्षण उत्पादन विभागात आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि निर्यात विभागाचा उप नियोजन अधिकारी म्हणून काम करणारा दीपककुमार शर्मा आणि श्री गंगानगर, राजस्थान येथील १६व्या इन्फंट्री डिव्हिजन ऑर्डनन्स युनिटची कमांडिंग ऑफिसर असलेली त्याची पत्नी, कर्नल काजल बाली यांच्या विरोधात सीबीआयने गुन्हा दाखल केला होता. संरक्षण उत्पादने आणि त्यांची निर्यात करणाऱ्या विविध खासगी कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत गुन्हेगारी कट रचून शर्मा नेहमीच भ्रष्ट आणि बेकायदेशीर कृत्यांमध्ये सामील असल्याचा आरोप सीबीआयच्या प्रवक्त्याने एका निवेदनात केला आहे. बेंगळुरू येथील अशाच एका कंपनीकडून शर्मा याला लाच देण्याच आल्याची माहिती सीबीआयला मिळाल्यानंतर सीबीआयने त्याच्या दिल्लीतील निवासस्थानी झडती घेतली. तिथून २.२३ कोटी रुपयांची रोख रक्कम आणि तीन लाख रुपयांची लाचेची रक्कम सीबीआयने जप्त केली.

# डिजिटल युगाचा सायलेंट किलर ; 18 हजार वृद्ध विसरले घरचा पत्ता

वृत्तसंस्था २१ डिसेंबर

**नवी दिल्ली:** सकाळी डोळे उघडल्यापासून ते रात्री झोपण्यापूर्वीच्या शेवटच्या क्षणापर्यंत आपली नजर स्क्रीनवरच खिळलेली असते. परंतु, हीच सवय आता आपल्या स्मरणशक्तीसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. मोबाईल आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी डोळे उघडल्यापासून ते रात्री झोपण्यापूर्वीच्या शेवटच्या क्षणापर्यंत आपली नजर स्क्रीनवरच खिळलेली असते. परंतु, हीच सवय आता आपल्या स्मरणशक्तीसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. जगातील अनेक देशांमध्ये कमकुवत होणारी स्मरणशक्ती ही एक मोठी समस्या बनली आहे. जपानमधून समोर आलेली आकडेवारी धडकी भरवणारी आहे. केवळ वृद्धच नव्हे, तर तरुण आणि मुलं देखील विसराळूपणाचे बळी ठरत आहेत. तज्ज्ञ याला डिजिटल युगाचा 'सायलेंट किलर' म्हणत आहेत, जो कोणताही गाजावाजा न करता हळूहळू मेंदू कमकुवत करत आहे.

जपानमध्ये २०२४ या वर्षात स्मृतीभ्रंश म्हणजेच स्मरणशक्ती गमावण्याची समस्या अत्यंत भीषण स्वरूपात समोर आली आहे.



तज्ज्ञांच्या मते, तंत्रज्ञानापासून पूर्णपणे दूर जाणं शक्य नसलं तरी त्यात संतुलन राखणं हे अत्यंत गरजेचं आहे. मेंदू सक्रिय ठेवण्यासाठी गोष्टी लक्षात ठेवण्याची सवय लावणं, सामाजिक संवाद वाढवणं, शारीरिक हालचाली आणि मानसिक व्यायाम करणं आवश्यक आहे. सरकारलाही डिमेंशियासारख्या आजारांशी लढण्यासाठी ठोस धोरणं आखावी लागतील.

### स्मृतीभ्रंशमुळे डिमेंशियाचा धोका

स्मृतीभ्रंश म्हणजे केवळ गोष्टी विसरणं इतपतच मर्यादित नाही. अनेक प्रकरणांमध्ये याचे रूपांतर पुढे 'डिमेंशिया'मध्ये होतं. डिमेंशियामध्ये स्मरणशक्तीसोबतच बोलणं, विचार करणं आणि निर्णय घेण्याची क्षमताही कमकुवत होते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, सध्या जगात ३.५ कोटींहून अधिक लोक डिमेंशियाने ग्रस्त आहेत. असा अंदाज आहे की २०५० पर्यंत ही संख्या ११.५ कोटींपर्यंत पोहोचू शकते. ही परिस्थिती स्पष्ट करते की कमकुवत होणारी स्मरणशक्ती हे आता जागतिक आरोग्य संकट बनले आहे.

### डिजिटल लाईफस्टाईलमुळे मेंदू होतोय कमकुवत

वाढता 'स्क्रीन टाईम' मेंदूच्या कार्यपद्धतीत बदल करत असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. सोशल मीडिया, व्हिडीओ आणि सतत मिळणारी माहिती यामुळे मेंदू थकत चालला आहे. यातून राग, चिडचिडेपणा, निद्रानाश आणि एकटेपणा वाढत आहे. स्क्रीनवर सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध असल्याने, गोष्टी विचार करून लक्षात ठेवण्याची गरज कमी होत चालली आहे. सामाजिक, शारीरिक आणि मानसिक हालचालींच्या कमतरतेमुळे मेंदू कमकुवत होत आहे. भारतात झालेल्या एका सर्वेक्षणातही लोकांची स्मरणशक्ती कमकुवत होत असल्याचं समोर आलं असून यामध्ये मुंबई पहिल्या क्रमांकावर आहे.

# खतांच्या दरवाढीने शेतकरी त्रस्त

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**मुंबई:** गेल्या काही वर्षापासून रासायनिक खतांच्या किमती सातत्याने वाढत असल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. यंदाही खतांच्या दरात झालेल्या लक्षणीय वाढीमुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

आगामी रब्बी हंगामाचे नियोजन करताना खर्च आणि उत्पन्न यांचा ताळमेळ जुळविणे अवघड झाले आहे. अशी व्यथा परिसरातील शेतकरी व्यक्त करीत आहेत. सध्याच्या शेती पद्धतीत उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा वापर अपरिहार्य झाला आहे. ही गरज लक्षात घेता शासनाकडून अनुदान दिले जात असले तरी प्रत्यक्षात बाजारात खतांच्या किमती दरवर्षी



वाढताना दिसत आहेत.

परिणामी शेतकऱ्यांवर उत्पादन खर्चाचा मोठा बजा पडत असून त्याचा परिणाम शेती अर्थकारणावर होत आहेत. रब्बी हंगामाच्या तोंडावरच खतांच्या किमती वाढत्या गोणीमागे २१० ते २५० रुपयांची वाढ झाल्याचे शेतकरी सांगतात. खतांच्या जुन्या व नव्या दरांमध्ये मोठी तफावत असून सुरू होत असलेल्या रब्बी हंगामात या दरवाढीचा शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. खतांबरोबरच कीटकनाशकांच्या किमतीही वाढत असल्याने एकूण उत्पादन खचांत लक्षणीय भर पडत आहे.

एकीकडे शेतीमालाला अपेक्षित दर मिळत नसताना दुसरीकडे निविष्ठांच्या किमती सात्याने वाढत असल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे. खरीप हंगामात सोयाबीन, कापूस काही प्रमाणात उत्पन्न निघाल्यावर बाजारात त्याला समाधानकारक दर मिळालेला नाही. परिणामी अनेक शेतकऱ्यांना रब्बी पेरणीसाठी सोयाबीन व कापूस खासगी व्यापाऱ्यांना कमी दरात विकावा लागला अशी परिस्थिती निर्माण झाली आहेत. खतांच्या दरवादीचा फटका थांबविण्यासाठी तसेच शेतमालाला हमीभाव मिळावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

## सैनिक कल्याण विभागात ७२ लिपिक पदांची भरती; ३१ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन अर्जाची मुदत

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे आणि त्यांच्या अधिपत्याखालील विविध जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमध्ये 'लिपिक टंकलेखक (गट-क)' या संवर्गातील एकूण ७२ रिक्त पदांच्या भरतीसाठी प्रक्रिया राबविण्यात येत असून पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या भरती प्रक्रियेत महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेले माजी सैनिक तसेच शासन निर्णयानुसार युद्ध काळात किंवा शांततेच्या काळात सैनिकी सेवेत कार्यरत असताना शहीद झालेल्या किंवा अपंगत्वामुळे नोकरीसाठी अयोग्य ठरलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील एका वारसदाराला पात्रतेनुसार अर्ज करता येणार आहे. एकूण ७२ पदांपैकी ३ पदे किमान ४० टक्के दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली असून, दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार व गुणवत्तेनुसार ही निवड केली जाणार आहे.

# श्री शिवाजी महाविद्यालयात संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान

### ◆ गाडगेबाबा अज्ञान, अंधश्रद्धा व अस्वच्छतेविरुद्ध प्रहार करणारे संत- प्रा. गजानन भारसाकळे

प्रतिनिधी २१ डिसेंबर



अकोला : शिक्षणाच्या अभावामुळे निर्माण झालेले अज्ञान व यामुळे फोफाविलेली अंधश्रद्धा यावर त्याकाळी संत गाडगेबाबांनी धनघणाती प्रहार करीत समाज प्रबोधनाचा यशस्वी प्रयत्न केला असे श्रद्धापूर्वक वक्तव्य दर्यापूरच्या गाडगेबाबा मंडळाचे संस्थापक - अध्यक्ष प्रा गजानन भारसाकळे यांनी केले . स्थानिक श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला तथा गाडगेबाबा सामाजिक प्रतिष्ठान, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध सामाजिक, पर्यावरणपूरक व प्रबोधनात्मक उपक्रम साजरे करण्यात आले.श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संपन्न झालेल्या या पुण्यातिथी कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना प्रा. भारसाकळे यांनी आपले अभ्यासपूर्ण वकृत्व तथा ओजस्वी वाणीने गाडगेबाबांच्या बालपणापासून ते निर्वाणदिना पर्यंत महत्वपूर्ण कार्यप्रसंग विषद करून सभागृहाला मंत्रमुग्ध केले .या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे कार्यकारिणी सदस्य सुरेशदादा खोटरे तथा प्रमुख उपस्थिती या नात्याने संस्थेचे माजी उपाध्यक्ष महादेवरावजी भुईभार, महाविद्यालयाच्या स्थानिय विकास समितीचे सदस्य सुरेशराव राऊत तथा कार्यक्रमाचे संयोजक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे यांची उपस्थिती होती . या प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेशदादा खोटरे यांनी संत गाडगेबाबांचे कार्य हे केवळ विचारांचे नव्हे तर कृतीचे प्रेरणास्थान आहे असे भाष्य करून विद्यार्थ्यांनी ते आत्मसात करण्याचे आवाहन केले . महादेवरावजी भुईभार यांनी गाडगेबाबांची स्वच्छता, श्रम व अर्थपूर्ण समाजसेवा यावर मार्गदर्शनातून प्रकाश टाकला . सुरेश राऊत यांनी अश्या उपक्रमांच्या साजरीकरणातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते असे मत व्यक्त केले . प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे यांनी महाविद्यालय सामाजिक उपक्रमांच्या आयोजनासाठी सातत्याने वर्षभर कार्यरत असते अशी माहीती विषद करून महाविद्यालयाच्या सर्वांगीण वार्षिक यशाचा आवर्जून उल्लेख केला . या प्रसंगी महाविद्यालयातील प्राविण्य प्राप्त खेळाडू व क्रीडा संघ यांचाही गौरव करण्यात आला . प्रा गजानन भारसाकळे यांनी आजवर साधलेल्या उल्लेखनिय कार्याचे यावेळी मंचावर उपस्थित मान्यवरांनी एकत्रित सत्कार करून अभिनंदन केले .

कार्यक्रमाचा शुभारंभ पहाटे पर्यावरण जनजागृती मिरवणूक व वृक्षारोपण कृतीने झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ संजय तिडके, संचलन डॉ. अर्चना पोटे तथा आभार प्रदर्शन रोहन बुंदेले यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धा; राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर

प्रतिनिधी २१ डिसेंबर



**अमरावती:** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजित 'राज्यस्तरीय शालेय आर्चरी (धनुर्विद्या) क्रीडा स्पर्धा २०२५-२६' उत्साहात पार पडली. जिल्हा क्रीडा संकुलातील आंतरराष्ट्रीय आर्चरी रेंजवर १७ ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत या स्पर्धा पार पडल्या.

स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी रिकर्व्ह राऊंडमध्ये खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावले. यातून निवडण्यात आलेला महाराष्ट्राचा चमू आता आगामी ६९व्या राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करेल.

**राष्ट्रीय स्तरासाठी निवडलेला संघ (रिकर्व्ह राऊंड):** १७ वर्षांखालील मुलेमध्ये आदित्य पवार (पुणे विभाग) - ६८६ गुण, ज्ञानेश चेरले (लातूर विभाग) - ६७७ गुण, आर्यन राठोड (क्रीडा प्रबोधिनी) - ६७२ गुण, सिद्धार्थ तिकोणे (पुणे विभाग) - ६६२ गुण.

**१७ वर्षांखालील मुलीमध्ये कुमकुम मोहोड (अमरावती विभाग)** - ६५७ गुण, मधुरा राठोड (अमरावती विभाग) - ६३९ गुण, प्रगती शिंदे (पुणे विभाग) - ६३६ गुण, संचिता बाबर (कोल्हापूर विभाग) - ६३४ गुण.

**१९ वर्षांखालील मुलेमध्ये कृष्णा शिंदे (पुणे विभाग)** - ६५५ गुण, साईराज हनमे (पुणे विभाग) - ६५४ गुण, अभिराज मानमोडे (अमरावती विभाग) - ६५० गुण, अभ्युदय पखाले (क्रीडा प्रबोधिनी) - ६४९ गुण.

**१९ वर्षांखालील मुलीमध्ये वैष्णवी पवार (पुणे विभाग)** - ६५५ गुण, तनुश्री श्रीनाथ (अमरावती विभाग) - ६१० गुण, गार्गी चव्हाण (पुणे विभाग) - ५८२ गुण, समीक्षा देशमुख (पुणे विभाग) - ५७९ गुण. सायंकाळच्या सत्रात मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पदके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या प्रसंगी आंतरराष्ट्रीय खेळाडू कुमकुम मोहोड हिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच स्पर्धेचे तांत्रिक कामकाज पाहणाऱ्या ३० पंचांचाही गौरव करण्यात आला. उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार, वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी स्वाती बाळापुरे, राज्य क्रीडा मार्गदर्शक अमर जाधव, निवड समिती सदस्य शुभांगी रोकडे, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदूरकर, प्रशिक्षक प्रविण शर्मा, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, क्रीडा अधिकारी अनिल इंगळे आदी या सोहळ्याला उपस्थित होते.

निवड झालेला १७ वर्षांखालील संघ ६ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान झारखंड येथे, तर १९ वर्षांखालील संघ १४ ते १८ जानेवारी २०२६ दरम्यान मणिपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होईल.

## आश्लेष जगताप यांच्या ऑर्डिनेट सोल्युशन कार्यालयाचे उद्घाटन थाटात

प्रतिनिधी २१ डिसेंबर

### ◆ सामाजिक तसेच राजकीय मंडळींची उपस्थिती



**अमरावती :** स्थानिक रुक्मिणी नगर, मेन रोड, येथील जी.के.पी. टॉवर येथे ऑर्डिनेट सोल्युशन प्रा.लि. कार्यालयाचे उद्घाटन जगताप परिवार तसेच मित्रमंडळींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. अंबा नगरीतील स्थानिक युवकांना जास्तीत जास्त रोजगार कसा देता येईल याकडे मी नेहमी लक्ष देईल. अशी ग्वाही ऑर्डिनेट सोल्युशन प्रा. लि.चे संचालक आश्लेष अजय जगताप यांनी दिली. कार्यक्रमात सुषमा भास्करराव जगताप, संजय जगताप, अनिता जगताप, अजय जगताप, मनीषा जगताप, गौरव जगताप, श्रावणी जगताप, कॉर्डिनेट सोल्युशन प्रा. लि. कंपनीचे संचालक आश्लेष जगताप, व ऋषिकेश कार, कपूरचंद कार, सुनिता कार, शिवाजी शिक्षण संस्थेचे दिलीप बाबू इंगोले, चंदूभाऊ कलोती, अरुण वरणगावकर, कमल मालवीय, गोपाल भाऊ राठी, शहर कॉंग्रेस कमिटीचे माजी शहराध्यक्ष विश्वासराव देशमुख, माजी नगरसेवक प्रदीप हिवसे, रावसाहेब ठाकरे, नरेंद्र तायडे, बबनराव देशमुख, सचिन जयस्वाल, दादासाहेब भापकर, नंदकिशोर फाळके, पत्रकार राजेंद्र ठाकरे, मनोहर देवतळे, मनीष देशमुख, वीरेंद्र विरखरे, श्याम वानखडे, आशिष राऊत, विलास भुयार, मिलिंद देशमुख, नितीन विधळे, धनंजय मोरोपे, अमोल देशमुख. तसेच ऑर्डिनेट सोल्युशन प्रा.लि. कंपनीचे सर्व कर्मचारी, तसेच परिसरातील नागरिक यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन श्रावणी जगताप यांनी केले. तर आभार आश्लेष जगताप यांनी मानले. या कार्यक्रमात इव्हेंट चे काम शुभम ढवळे यांनी पाहले.

## निवृत्तीवेतन व कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांच्या संबंधित पाच सेवा अधिसूचित

प्रतिनिधी २१ डिसेंबर

### ◆ महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम

**अमरावती:** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३ मधील तरतुदीनुसार वित्त विभागाने दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार निवृत्तीवेतन व कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांसाठी एकूण पाच सेवा अधिसूचित केल्या आहेत. यानुषंगाने पात्र निवृत्तीवेतनधारक व कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांनी त्यांना आवश्यक असलेल्या अधिसूचित सेवा, संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यांकडून निर्धारित कालावधीत प्राप्त करून घ्याव्यात. सेवा प्रदान करण्यात विलंब झाल्यास किंवा विहित कारणे नमूद न करता सेवा नाकारण्यात आल्यास संबंधित व्यक्तीस प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकाऱ्यांकडे अपिल दाखल करण्याची तरतूद आहे, अधिनियमान्वये करण्यात आली आहे. अशी माहिती राज्यसेवाहक्क आयुक्त कार्यालयाचे उपसचिव देवेंद्र चव्हाण यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली.

या अधिसूचनेमध्ये सेवा प्रदान करणारे पदनिर्देशित अधिकारी, तसेच प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा सविस्तर तपशील नमूद करण्यात आला आहे. ही अधिसूचना शासनाच्या अधिकृत सेवार्थ संकेतस्थळावर https://esvaarthed.mahakoshed.goved.in उपलब्ध करुण देण्यात आली आहे. तदनंतरही अधिसूचित सेवा प्राप्त न झाल्यास पात्र व्यक्ती राज्य सेवा हक्क आयुक्त, अमरावती विभाग यांच्याकडे तृतीय अपिल दाखल करू शकते. या निर्णयामुळे निवृत्तीवेतनधारकांच्या सेवासुविधांना अधिक पारदर्शकता व वेळबद्धता मिळणार असल्याचे उपसचिव श्री. चव्हाण यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## आरटीओ कार्यालयात वाहन तपासणीचे होणार व्हिडिओ रेकॉर्डिंग

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अमरावती:** प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथे वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाची प्रक्रिया आता अधिक पारदर्शक होणार असून, केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार होणाऱ्या संपूर्ण वाहन तपासणीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परिवहन आयुक्त कार्यालयाच्या मान्यतेनुसार, ही व्हिडिओ रेकॉर्डिंगची प्रक्रिया भाडे तत्त्वावर राबवली जाणार असून, यासाठी अनुभवी व्हिडिओ रेकॉर्डिस्ट आणि पुरवठादारांकडून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात आली आहेत. प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, इच्छुक अनुभवी व्यक्ती किंवा संस्थांनी आपली दरपत्रके 'प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, कॅम्प, अमरावती - ४४४६०२' या पत्त्यावर सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रके सादर करण्याची अंतिम मुदत २९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. वाहन चाचणीच्या प्रक्रियेत अचूकता आणि पारदर्शकता राखण्यासाठी हा व्हिडिओ रेकॉर्डिंगचा उपक्रम प्रस्तावित करण्यात आला असून, विहित मुदतीत जास्तीत जास्त अनुभवी अर्जदारांनी आपले दरपत्रक सादर करावे, असे आवाहन आरटीओ कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## शहरात कलम ३७ (१) व (३) लागू

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अमरावती:** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिसूचना व आदेशान्वये पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. अधिसूचना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) नुसार शस्त्र तसेच विस्फोटकाच्या मालाची वाहतूक, जमावाचे एकत्रीकरण, बदनामीकारक वक्तव्य तसेच कलम ३७ (३) नुसार कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजित करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन उपरोक्त नमूद कालावधीकरिता बंदी घालण्यात येत आहे. सदर प्रतिबंधात्मक आदेश शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालयाचे परिक्षेत्र वगळून करण्यात आला असून दि. ३० डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी कळविले आहे.

## अंधश्रद्धेचे निर्मूलन हीच गाडगेबाबांना खरी आदरांजली..- प्राचार्य, डॉ.के.व्ही.मेहरे

प्रतिनिधी २१ डिसेंबर



**अमरावती:** समाजामध्ये वर्षानुवर्ष खोलवर रुतून बसलेली अंधश्रद्धा तसेच अशिक्षितपणा, अज्ञान या सर्व गोष्टींचे उच्चाटन करून समाज खऱ्या अर्थाने निरोगी करणे हीच वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबांना खरी आदरांजली ठरेल असे मनोगत आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. के.व्हि.मेहरे यांनी व्यक्त केले. वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमातून त्यांनी आपले मत मांडले. स्थानिक कुंभारी येथील श्री गणेश कला महाविद्यालयात नुकताच वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागातर्फे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना हरार्पण करण्यात आले.याप्रसंगी मंचकावर संगीत विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनील पारिसे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.जयंत राऊत आदींची उपस्थिती होती. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना प्रा. जयंत राऊत यांनी वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्यावर सखोल प्रकाश टाकून उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा.डॉ.सुनील पारिसे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. मार्गदर्शनपर कार्यक्रमा नंतर वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांना महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता अभियान राबवून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.बी.यु.जामनिक यांनी तर आभार प्रदर्शन संगीत विभागाचे प्रा.सतीश जमधाडे यांनी पार पाडले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.प्रदीप भाऊ ढोमणे, श्री.गजानन निंबाळकर, श्री.भीमराव तायडे, श्री.संजय ढोले यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## सोमठाणा खुर्द येथील प्रकल्पग्रस्तांना मोबदला मिळणार

### ◆ कागदपत्रे सादर करण्याचे अकोट वन्यजीव विभागाचे आवाहन

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अमरावती :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत मौजे सोमठाणा खुर्द या गावाचे पुनर्वसन सन २०१३-१४ मध्ये करण्यात आले असून, या गावातील ४२ शेतमुल्यांकनधारक व २१ वनहक्कधारक यांना आता नवीन भूसंपादन कायद्यानुसार शेतीची एक पट रक्कम व त्यावरील ३० टक्के दिल्याचा रक्कम अदा करण्यात आलेले आहे. भूसंपादन कायदा २०१३ नुसार, मौजे सोमठाणा खुर्द येथील ४२ शेतमल्यांकनधारक व २१ हक्क धारक यांच्यासाठी निधी उपलब्ध झाला असून शेतमुल्यांकन व वन हक्कधारक यांना शेतीचा मोबदला रक्कम वितरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग यांनी यासंदर्भात माहिती दिली असून उर्वरित लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे तातडीने सादर करण्याचे आवाहन केले आहे.

मौजे सोमठाणा खुर्द येथील पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या तरतुदींनुसार झाले होते. सुरुवातीला शासन निर्णयानुसार ४२ शेतमुल्यांकनधारक व २१ वनहक्कधारक यांना शेतीच्या मूल्यांकनाची १ पट रक्कम आणि त्यावर ३० टक्के दिलासा रक्कम देण्यात आली होती. मात्र, केंद्र शासनाचा भूसंपादन अधिनियम २०१३ लागू झाल्याने आणि नवीन धोरणानुसार जमिनीचा मोबदला वाढीव दराने मिळणे अपेक्षित असल्याने, आता या लाभार्थ्यांना मुल्यांकनाच्या ४ पट रक्कम देय ठरली आहे. त्यानुसार, यापूर्वी अदा केलेली १ पट रक्कम व ३० टक्के दिलासा रक्कम वजा करून उर्वरित मोबदला वितरित करण्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे.

काही लाभार्थ्यांना यापूर्वीच रक्कम अदा करण्यात आली आहे, परंतु उर्वरित शेतमुल्यांकनधारक व वनहक्कधारकांनी अद्याप आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत. यामुळे प्रशासनाला देय रक्कम वितरित करण्यात तांत्रिक अडचणी येत आहेत. तरी संबंधित लाभार्थ्यांनी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर अर्ज, बँक पासबुकची छायाप्रत, शेतीचा ७/१२ उतारा आणि मूळ खातेदार मयत असल्यास वारस प्रमाणपत्र व वारसाच्या बँक खात्याची छायाप्रत अकोट वन्यजीव विभाग कार्यालयात तात्काळ जमा करावी. लाभार्थ्यांची नावनिहाय यादी महाराष्ट्र वनविभागाच्या ˚.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, ग्रामस्थांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला प्रलंबित मोबदला प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन अकोट वन्यजीव विभाग उपवनसंरक्षक आर. एस. टोलिया यांनी केले आहे.

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# योजनेसाठी जमीन खरेदी करणार : समाजकल्याण कार्यालय

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अकोला:** कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेसाठी समाजकल्याण कार्यालयाकडून जिल्ह्यात शेतजमीन खरेदी करण्यात येणार असून, इच्छूक शेतमालकांनी प्रस्ताव देण्याचे आवाहन जिल्हा समाजकल्याण सहायक आयुक्त मारोती वाठ यांनी केले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता ज्यांना आपल्या वैयक्तिक मालकीची शेतजमीन या योजनेअंतर्गत विक्री करावयाची आहे, अशा शेतमालकांनी जमीन विक्रीसंबंधी प्रस्ताव समाजकल्याण कार्यालयात सादर करावे. ई-क्लास, गावठाण जमीन, शासकीय जमिनीकरिता ही योजना लागु नाही. शेतजमिनीवर कोणताही बोजा नसावा. याबाबत अद्ययावत ७/१२ व आज रोजीच्या मुल्यांकनासह प्रथम कार्यालयात संपर्क साधावा व विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयातुन घेऊन जावा.

## गुरु नानक कॉन्व्हेंट स्कूल येथे आरोग्य तपासणी शिबिर



प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अकोला :** सिंघ शिक्षण प्रसारक मंडळ संचालित गुरु नानक कॉन्व्हेंट स्कूल, अकोला येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.अध्ययन, अध्यापन आणि आरोग्य यांचे योग्य नियोजन केल्यास कुशल विद्यार्थी घडविले जातात. हे पुष्यकर्म करणारे शिक्षकांचे व डॉक्टरांचे धन्यवाद व्यक्त करतो असे मत मनोहर विरवाणी, सचिव गुरुनानक कॉन्व्हेंट स्कूल अकोला यांनी व्यक्त केले.

या शिबिरात डॉ नारायण साधवानी माजी वैद्यकिय अधिकारी, डॉ. शिरिष देशमुख, डॉ. श्वेता विरवाणी, डॉ. पांडव, डॉ दुश्यंत अलिमचंदानी, डॉ. एस. एस. खोरिया, डॉ. आर. अग्रवाल, डॉ. कुळकर्णी, डॉ. मुस्कान पंजवाणी, डॉ विजय आहुजा, डॉ. बबिता आहुजा या बालरोग तज्ञ, दंत शल्य चिकीत्सक, नेत्ररोग तज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. तथा आरोग्यदायी जिवनशैली स्विकारण्या करिता महत्वपुर्ण सुचना दिल्यात.

# लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील सुरक्षा नावालाच...?

प्रतिनिधी २१ डिसेंबर

## सुरक्षा रक्षकाकडे रुग्णालयात येणाऱ्यांची नोंदच नाही..

**मूर्तिजापूर :** येथील श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील सुरक्षा राक्षकांची भूमिका महत्वाची असली तरी, रुग्णालयात सुरक्षा राक्षकाच्या पद कमी मुळे येथे येणाऱ्या रुग्णाची अथवा येथील काम करणाऱ्या विशेषतः महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून शासकीय रुग्णालयातील सुरक्षा नावापुरतीच असल्याने रुग्ण कल्याण समिती व प्रशासकीय यंत्रनेच्या कार्यावर प्रश्न उभे होत आहे.

. मूर्तिजापूर येथील श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा सामान्य रुग्णालय हे जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे शासकीय रुग्णालय असून येथे ग्रामीण विभागा सह शहरातून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र येथील रुग्णालयात असलेल्या सुरक्षारक्षकांच्या पद रिक्तते मुळे (पद संख्या कमी मुळे) रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांसह रुग्णांच्या सुरक्षातेचा प्रश्न निर्माण झाला असून सुरक्षा केवळ नावापुरतीच की काय..? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडलाय. ज्या मुळे केवळ प्रशासनाच्या कागदावरच सुरक्षा असल्याचे भासावल्या जात आहे. या गंभीर्याकडे लोकप्रतिनिधी अथवा रुग्ण कल्याण समिती अथवा रुग्णालयचे वैद्यकीय अधिकारी काय गांभीर्याने घेतात या कडे लक्ष लागले आहे. नुकतच शहरातील शासकीय रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका वैद्यकीय अधिकाऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने १७ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी कळताच श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा सामान्य रुग्णालयात मोठी गर्दी उसळली होती मात्र दुसरीकडे याच दिवशी १७ तारखेच्या मध्यरात्री दोन युवक चक्क केक घेऊन आले आणि थेट प्रवेश केला तो लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील वार्डमध्ये त्यांच्या पाठीमागे शहरातील काही सतर्क पुरुषांनी नेमक हे सदृहस्थ केक घेऊन जात तरी कुठे हे पाहण्याकरता गेले असता , रुग्णालयाच्या वार्ड मधील एका महिला कर्मचाऱ्याचा वाढदिवस साजरा करण्याकरता हे गृहस्थ घेकडो किलोमीटर लांबून आल्याचे समजते तर या महाशयांनी थेट रुग्णालयाच्या वार्डमध्ये प्रवेश करण्याआधी कार्यरत वैद्यकीय अधिकारी अथवा सुरक्षा रक्षकांची अनुमती घेणे गरजेचे समजले नाही. विशेष म्हणजे सदर बाबत रुग्णालयातील सुरक्षा रक्षक अथवा वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही काहीच माहिती नसून ज्या वार्डमध्ये हे गृहस्थ वाढदिवस साजरा करण्याकरता गेले त्या वार्ड मध्ये कुठलेच रुग्ण नसून महिला कर्मचारी आणि हे गृहस्थच असल्याचा गांभीर्य जनक प्रकार समोर आला असून या घटनेवरून तरी सिद्ध होते की श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील सुरक्षा वाऱ्यावर च

# जिल्हा परिषद निवडणुका लांबल्याने उमेदवारांचे गणित कोलमडले; प्रचाराची धावपळ वाया?

विशेष प्रतिनिधी २१ डिसेंबर

**कुटासा:** जिल्हा परिषद निवडणुका पुढे ढकलल्या गेल्याने संभाव्य उमेदवारांचा हिरमोड झाला आहे. गेल्या काही आठवड्यांपासून अनेकांनी क्षेत्रात जोरदार तयारी सुरू केली होती. मतदार संपर्क, गट-तटांची जुळवाजुळव, पक्षांतर्गत चर्चासत्रे, तसेच उमेदवारीसाठी होणारी पडद्यामागची हालचाल या सर्वांमध्ये उमेदवार अक्षरशः गुंतले होते.

निवडणुका जवळ येत असल्याच्या अंदाजावर अनेकांनी प्रचार साहित्य छापण्यापासून सोशल मीडियावर मोहीम राबवण्यापर्यंत मोठ्या प्रमाणावर खर्च केला होता. काहींनी गावोगाव सभा घेतल्या. तर काहींनी कार्यकर्त्यांचे वारंवार दौरे करत हवा तयार करण्याचा प्रयत्न केला. परंतु निवडणूक प्रक्रिया स्थगित झाल्याची घोषणा झाल्यानंतर सर्वांचा अंदाज चुकला. स्थानिक पातळीवर आता चर्चा सुरू आहे की पुढील कार्यक्रम काय असेल आणि पक्षांतर्गत नवे समीकरण तयार होईल का. काही उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की निवडणुकीचे वेळापत्रक अचानक थांबवल्याने त्यांच्या महिन्याभराच्या तयारीवर पाणी फिरले.

राजकीय वर्तुळात मात्र हे स्पष्टपणे जाणवते की निवडणुका लांबणीवर गेल्याने प्रत्येक गटाला नवी रणनीती आखावी लागणार आहे. मतदार संपर्क टिकवून ठेवणे, कार्यकर्त्यांना बांधून ठेवणे आणि पुन्हा एकदा मोहीम सुरू करण्यासाठी तयारी करणे हे आव्हान आता उमेदवारांसमोर उभे राहिले आहे.

हळूहळू वाढत असलेली निवडणूक चुरस काही काळासाठी शांत झाली असली तरी पुढील घोषणा होताच स्पर्धा पुन्हा उफाळून येईल यात शंका नाही.

## स्व. श्रीमती पुष्पादेवी गोयनका यांचे मरणोत्तर नेत्रदान

**अकोला :** स्थानिक गीतानगर येथील निवासी स्व. श्रीमती पुष्पादेवी राधेश्याम गोयनका यांचे दिनांक १८ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूनंतर त्यांच्या अंतिम इच्छेनुसार गोयनका कुटुंबाने नरेंद्र रतनलाल अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला नेत्रदान संस्थेशी संपर्क साधून त्यांचे मरणोत्तर नेत्रदान केले. अकोला नेत्रदान संस्थेचे संस्थापक डॉ. चंद्रकांत पनपालिया व सचिव श्याम पनपालिया यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय नेत्रपीठाचे समन्वयक नंदन चोरपगार व डॉ. उजमा यांनी स्व. श्रीमती पुष्पादेवी राधेश्याम गोयनका यांच्या नेत्रांचे संकलन केले. नेत्रदानाच्या या कार्यात सुनील गोयनका, ओमप्रकाश गोयनका, संतोष गोयनका, अनुज गोयनका व संपूर्ण गोयनका कुटुंबाचा मोलाचा वाटा होता.

# नगर परिषदेचा भोंगळ कारभार: गाडगे महाराजांच्या पुण्यतिथीला सुद्धा मंदिर अंधारात!

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**तेल्हारा:** संपूर्ण जगाला स्वच्छतेचा आणि प्रकाशाचा मार्ग दाखवणाऱ्या वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथी दिनीसुद्धा, तेल्हारा नगर परिषदेच्या उदासीनतेमुळे महाराजांचे मंदिर अंधारात राहिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सामाजिक कार्यकर्ते सचिन चित्ते यांनी यासंदर्भात आधीच निवेदन देऊनही प्रशासनाने त्याकडे सपशेल दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**भक्तांमध्ये संतापाची लाट:** ज्या महापुरुषाने आपले संपूर्ण आयुष्य जनसेवेसाठी वेचले, त्यांच्याच स्मृतिदिनी नगर परिषदेला साधी दिवाबत्तीची सोय करता येऊ नये, हे प्रशासनाचे मोठे अपयश मानले जात आहे.

**प्रशासनाचा हलगर्जीपणा:** सणासुदीच्या किंवा महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथीला शहरात मूलभूत सुविधा पुरवणे हे नगर परिषदेचे कर्तव्य आहे.

**निवेदनाकडे दुर्लक्ष:** लोकप्रतिनिधी किंवा सामाजिक कार्यकर्त्यांनी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती वाढली असल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

**सचिन चित्ते यांचा रोष:** महापुरुषांच्या सन्मानाबाबत प्रशासन इतके बेजबाबदार कसे असू शकते? वारंवार पाठपुरावा करूनही जर कामे होत नसतील, तर हा सामान्य जनतेचा अपमान आहे, अशा शब्दांत सचिन चित्ते यांनी आपला रोष व्यक्त केला आहे.



### नेमका प्रकार काय?

२० डिसेंबर रोजी संत गाडगे बाबा यांची पुण्यतिथी साजरी केली जात असताना, तेल्हारा शहरातील न प शाळा क्र २ मधील गाडगे बाबा मंदिर परिसरात योग्य दिवाबत्तीची सोय करण्यात आली नव्हती. या विशेष दिवसाचे औचित्य साधून मंदिर परिसर प्रकाशमान असावा, यासाठी सचिन चित्ते यांनी नगर परिषदेला लेखी निवेदन दिले होते. मात्र, नगर परिषद प्रशासनाने या निवेदनाला 'केराची टोपली' दाखवत कोणतीही कार्यवाही केली नाही.

## शिक्षक मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**अकोला:** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघासाठी प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय व तहसील कार्यालय स्तरावर करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, मतदारांना आपले नाव शोधण्यासाठी लिंकही उपलब्ध करून देण्यात आली आहे. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघासाठी दि. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर मतदारयाद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. मतदार नोंदी कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी दि. ३ डिसेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय व तहसील कार्यालय स्तरावर करण्यात आली आहे. पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी मतदारांना त्यांचे नाव शोधण्यासाठी https://ceoelection.maharashtra.goved.in/Constit}ncyRoòs/TaåGElectoralRoòsSimple.asp&s या संकेतस्थळाचा वापर करण्याचे आवाहन सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

# राष्ट्रीय चरित्र श्रवणाची आज गरज -हभप पटवारी

प्रतिनिधी २१ डिसेंबर

## कीर्तन महोत्सवाचा आज समारोप



**अकोला:** जीवनाच्या यशस्वीतेची फलश्रुती ही उत्तम पुत्रामध्ये मध्ये अंगीकृत आहे.चांगल्या सुपुत्राची गरज ही कुळाच्या उद्धारासाठी असते. केवळ उत्तम संसार केला,घर सांभाळले, व्यवहार केला, तर तो सुपुत्र होत नसून पुत्र होऊ शकेल. मात्र जो प्रभू चरणी लीन होऊन कुळाच्या उद्धाराची याचना करतो व कुळाच्या उद्धाराचा प्रयत्न करतो तोच खरा सुपुत्र होय. जिवंत आई-वडील असताना त्यांच्या इच्छेची जो संपूर्णपणे पूर्ती करतो व आई-वडील जोपर्यंत अस्तित्वात आहेत तोपर्यंत त्यांची सेवा करतो तोच खरा सुपुत्र असल्याचा हितोपदेश हभप लक्ष्मीप्रसाद पटवारी यांनी केला.आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या वतीने किर्तन सेवेकरी स्व. सौ शालिनी वामनराव नाईकवाडे यांच्या स्मृतीत स्थानीय प्रमिलाताई सभागृहात आयोजित तीन दिवसीय कीर्तन महोत्सवात पुणे येथील हभप लक्ष्मीप्रसाद पटवारी यांनी द्वितीय कीर्तन सादर करून ठबाजीप्रभू देशपांडेठ यांच्या कार्यावर निरूपण केले. संत रामदास स्वामी यांच्या ठसुपुत्र संसारी, कुळाचे मंडणठ या अभंगावर सुंदर किर्तन सादर केले. ते म्हणाले, उत्तम सुपुत्र निपजण्या साठी ज्याप्रमाणे उत्तम संस्काराची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे आई-वडिलांवर ही त्याच आदर्श संस्काराचे रोपण होणे अत्यावश्यक ठरत असते. आपल्या पोटी उत्तम व आपल्या कुळाचा उद्धार करणारा सुपुत्र निर्माण व्हावा अशी आशा जोपर्यंत आई वडिलांना वाटत नाही, तोपर्यंत सुयोग्य सुपुत्र होणार नाही. आपल्या समाजात उत्तम संस्काराचे रोपण होत नसल्यामुळे समाज फार मागे जात असल्याचेही हभप पटवारी यांनी यावेळी सांगितले. पालकांनी आपल्या पाल्यांवर संस्कार निर्मितीसाठी डोळेझाक केली आहे. त्यांना सत्संगात जाऊ देत नाहीत, त्यांना संस्कार देऊ शकत नाहीत. शिक्षण व फाजील बाबीच्या अतिरेकामुळे हे होत असून याला पालक जबाबदार असल्याचे त्यांनी सांगितले. चांगल्या पुत्रांची कामना ही माता पित्यांची पहिली आशा पाहिजे. ज्याप्रमाणे उत्तम विचार होतील तसे पुत्र होतील. जिजाऊंना ही डोहाळे लागले. तेव्हा त्या डोहळ्यात त्यांना सिंहासनावर आरुढ झालेला आपला पुत्र दिसला. त्याच दृष्टीने त्यांनी पुढे वाटचाल केली असल्याचे त्यांनी सांगितले. आपले पाल्य बाहेर काय करीत असतात याची जाणीव पालकांना झाली पाहिजे. आपण गाफील राहिलो तर समाज कमकुवत होणार.मुले जोपर्यंत धार्मिकतेचा आश्रय घेणार नाहीत. तोपर्यंत तेजस्विता निर्माण होणार नसल्याचे त्यांनी यावेळी अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, आपल्या जन्मदाता आई पेक्षा ही जास्त प्रेम भारत मातेचे व आपल्या मातीचे जो करतो तोच खरा सुपुत्र असून यामध्ये अनेक महापुरुष, स्वातंत्र्य सेनानी होऊन गेले असल्याचे सांगून सत्राच्या उत्तरार्धात त्यांनी बाजीप्रभू देशपांडे यांच्या महान देशभक्तीची गाथा छत्रपती शिवरायांच्या तेजस्वी प्राक्रमाच्या अनुषंगाने सादर करीत सभागृहात विरता निर्माण केली. संगीतमय मंगलाचरणाने सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला.

# कापशी रोड येथे स्वच्छता व पर्यावरण संरक्षण जनजागृती रॅली उत्साहात

प्रतिनिधी २१ डिसेंबर





**अकोला:** येथून जवळच असणाऱ्या कापशी रोड येथे संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वच्छता व पर्यावरण संरक्षण जनजागृती रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत कापशी रोड व वंडर किड्स स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, कापशी रोड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या रैलीचा प्रारंभ संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाला.या नंतर विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर प्रभावी पथनाट्य सादर करून स्वच्छता व पर्यावरण संरक्षणाचा संदेश उपस्थित नागरिकांपर्यंत पोहोचवला. या वेळी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ उमाळे, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, संस्थेचे संस्थापक सी. के. इंगळे तसेच प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. या संपूर्ण उपक्रमासाठी वंडर किड्स स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या दिपाली गवई यांच्या मार्गदर्शना खाली शिक्षिका चैतन्य वाघमारे, राधा गायगोले, वैष्णवी अरबुने, सायली वाघमारे, शिवानी सुरवाडे, प्रियंका चाटसे, जयश्री दंदी, वैशाली तायडे, श्रेयशा वानखडे, भाग्यश्री इंगळे, तसेच शिक्षक राजकुमार दाभाडे आणि शिक्षकेतर कर्मचारी सुमन केवट यांनी विशेष परिश्रम घेतले. या रैलीस प्रवीण जामनिक यांचे सहकार्य लाभले. ग्रामपंचायत कापशी रोड तर्फे विद्यार्थ्यां साठी बिस्किट पॅकेट वाटपने रॅलीचा समारोप करण्यात आला.

# श्रीमद् भागवत कथा सप्ताहाची ४२ वर्षाची परंपरा

## पाटसुल रेल्वे श्री वेताळ बाबा यात्रा महोत्सवाला प्रारंभ

प्रतिनिधी २१ डिसेंबर




**अकोट:** बाबा नवसाला पावणारे अकोट तालुक्यातील धार्मिक स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेले वेताळ बाबा चे ठिकाण नावारूपाला आहे.

सालाबाद प्रमाणे या ठिकाणी भव्य दिव्य पाच आठवड्यामध्ये यात्रा भरते तेव्हा महाराष्ट्रामधून भक्तगण यात्रेला हजर होतात स्व. नारायण खंडार यांच्या वाढ वडिलांपासून वेताळ बाबा चे ठिकाण स्थानापन्न आहे अनेकांच्या मनोकामना या ठिकाणी पूर्ण होतात. वेताळबाबा हा भक्तांच्या हाकेला धावणारा आहे. वेताळ बाबाच्या पंचक्रोशी मधील वस्तुस्थितीचे अनेक उदाहरणे आहेत जेव्हा एखाद्या व्यक्तीला चकवा पडायचा तेव्हा नातेवाईक दिवस रात्र हरवलेला व्यक्तीला पाहायचे. पण तो व्यक्ती वेताळबाबाच्या मंदिरात दिसायचा, जनतेची श्रद्धा वेताळबाबावर आहे पाटसुल गावच्या पंचक्रोशी मधील नागरिकांचं ते दैवतच बनलेले आहेत खंडार परिवार व पंचक्रोशीतील गावकऱ्यांच्या सहकार्याने भव्य दिव्य यात्रा आज रोजी ही अस्तित्वात आहे. सालाबाद प्रमाणे पौष महिन्यातील प्रत्येक रविवारी ही यात्रा संपन्न होते.

सालाबाद प्रमाणे पार पडणाऱ्या यात्रेच्या कार्यक्रमांमध्ये पाटसुल रेल्वेच्या पंचक्रोशी मधील ह भ प मंडळे यांची उपस्थिती राहते. या भाविक भक्तांच्या यात्रेमध्ये अनेक भाविकभक्त मोठ्या भक्तीने भावाने आपली हजेरी लावतात. तसेच ४१ वर्षाची अखंडपरंपरा ह-भ-प वे.शा. सुरेश जोशी महाराज शास्त्री देवरीकर श्रीमद् भागवत संगीतमय कथा सप्ताह हा अखंडपणे चालू आहे.

सुरेश जोशी महाराज त्यांचा मुलगा रामचरित्र कथा वाचक असून ह भ प श्रीकांत महाराज जोशी देवरीकर वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत वेताळ बाबांच्या सेवेची परंपरा चालवत आहेत. त्यांच्यासोबत संगीत विशारद झालेले व त्यांचा संच सालाबाद प्रमाणे रामचरित्र कथा होणारे वाचनामध्ये गायनाचार्य म्हणून जोशी महाराज यांना संगीताची साथ देतो तर रामचरित्र कथा वाचक त्यांचा लाडका मुलगा श्रीकांत महाराज कथा वाचनाचे कार्य करतात. आणि हभप मोहन म. मेतकर जैन पुरकर, यांचा जाहीर कीर्तनाचा कार्यक्रम आहे. सालाबाद प्रमाणे ठरलेली यात्रा २१ डिसेंबर रोजी सुरुवात होत आहे यात्रेच्या पाचव्या रविवारी दि. ७ जानेवारी २०२६ रोजी मंदिराच्या वतीने महाप्रसादाचे सुद्धा आयोजन केले असून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी अखंड श्रीमद् भागवत कथेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान आयोजन समितीकडून करण्यात आले.

# आधार नोंदणीच्या साह्याने शोध; ११ वर्षांनंतर मुलगा स्वगृही पोहचला

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अकोला:** आधारकार्डाच्या नोंदणीच्या साह्याने एका हरवलेल्या बालकाच्या घराचा पत्ता मिळविण्यात यश आले. त्यामुळे ११ वर्षानंतर हा मुलगा स्वगृही परतण्याचा मार्ग मोकळा झाला.

याबाबतची हकीकत अशी की, ११ वर्षापूर्वी ६ वर्षांचा मुलगा मध्यप्रदेशातील जबलपूर येथून हरवला. तो महाराष्ट्रात पोलीसांना सापडल्यानंतर त्याला नागपूर येथे बालगृहात दाखल करण्यात आले. त्यानंतर मुंबई, बीड, बुलडाणा अशा विवीध जिल्ह्यांतील बालगृहात तो राहत होता.

बुलडाणा येथे शासकीय बालगृहात असताना तिथे त्याची आधार नोंदणी करण्यात आली. मात्र ३ ते ४ वेळा नोंदणी करून सुध्दा आधारकार्ड प्राप्त होत नव्हते. आधार तक्रार केंद्राशी संपर्क साधूनही उपयोग झाला नाही. त्यामुळे शासकीय बालगृहाचे शिक्षक केशव घुगे यांनी अकोला जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सुनील लाडूलकर यांना फोन करून अडचण सांगितली. त्यानंतर श्री. लाडूलकर यांनी संबंधित बालकाच्या आधार नोंदणीच्या पावत्या मागवून घेतल्या आणि आधार नोंदणीच्या ग्राहक सेवा प्रतिनिधीशी स्वतंत्रपणे पाठपुरावा सुरू केला. या बालकाची बुलडाणा येथे झालेली नोंदणी रद्द झाली. या बालकाचे यापूर्वीचे आधारकार्ड असल्यामुळे नवी नोंदणी होऊ शकलेली नाही, असे ग्राहक सेवा प्रतिनिधीने सांगितले. त्यावरून श्री. लाडुलकर यांनी ऑनलाईन तक्रार नोंदवून घेण्यात आली. ऑनलाईन तक्रार दाखल केल्यावर ३० दिवसांनंतर तक्रारीचे निराकरण होऊन जुना आधार क्रमांक प्राप्त होऊ शकला. अधिक्षकांनी त्या बालकाला आधार सेंटरवर नेले. तिथे हाताचे ठसे देऊन बालकाचे जुने आधारकार्ड डाऊनलोड करण्यात आले. त्या आधारकार्डावर जबलपूर येथील पत्ता आढळला. या पत्त्यानुसार संबंधित जबलपूरच्या जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना संपर्क करण्यात आला.

# 'स्वाधार'साठी अर्ज करण्यात ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अकोला:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेत अर्ज करण्यास ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र; तथापि, वसतिगृहातील क्षमतेअभावी प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे ही योजना राबवली जाते. त्यात भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांनी स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते.

यापूर्वी ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज भरण्याची शेवटची तारीख दि. ३० नोव्हेंबर होती; पण ऑनलाईन प्रणालीमध्ये तांत्रिक अडचणी आल्याने अनेक अर्ज प्रलंबित होते. त्यामुळे जिल्हा स्तरावरील तसेच तालुका स्तरावरील महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास दि. ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांनी तातडीने ऑनलाईन अर्ज होस्टेल मॅनेजमेंट सिस्टीम https://hmascrutinyworkflow.mahait.org/ या संकेतस्थळावर करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त मारोती वाठ यांनी केले आहे. शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेसाठी यापूर्वी अर्ज केलेला असणे आवश्यक आहे. त्यामुळे स्वाधार योजनेकरिता अर्ज भरणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता स्वाधार योजनेचा प्रथम वर्षाकरिता अर्ज करताना ही महत्वाची बाब लक्षात घेवून ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616 | बातम्यासाठी संपर्क 9075012801

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५

## नायगाव (खु) जवळ भरधाव दुचाकीची धडक; महिलेचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**वणी :** तालुक्यातील नायगाव (खु) गावाजवळ रोड क्रॉस करताना भरधाव दुचाकीची धडक बसल्याने एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. ही हृदयविदारक घटना 19 डिसेंबरला सायंकाळी घडली. मृत महिलेचे नाव मंगला अशोक मिलमिले रा. नवीन वागदरा, (वणी) असे आहे. अपघातानंतर बाईक चालक पसार झाला. या प्रकरणी मृतकाच्या जावयाकडून वणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार, मृतक मंगला मिलमिले या रोड क्रॉस करत असताना वरोराकडून वणीच्या दिशेने एक भरधाव लाल रंगाची पल्सर (MH -29 CK -1372) येत होती. या बाईकने मंगला यांना जोरदार धडक दिली. अपघातात मंगला यांच्या डोक्याला गंभीर मार लागला. रक्तस्राव झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर आरोपी बाइकचालक पळून गेला. घटनास्थळी लोक जमा झाले. पोलिसांना याची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

# यवतमाळ पालिकेत भाजप-काँग्रेसमध्ये लढत

## भाजपाच्या प्रियदर्शनी उईके आघाडीवर

प्रतिनिधी २१ डिसेंबर

■ **यवतमाळ :** यवतमाळ नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदासह ५८ नगरसेवकांसाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी रविवारी सकाळी धामणगाव मार्गावरील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये सुरू झाली. शनिवारी पार पडलेल्या मतदानात ५५.४९ टक्के मतदान झाले होते.



प्रियदर्शनी उईके



प्रियांका मोघे

मतमोजणीच्या सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये नगराध्यक्षपदासाठी काँग्रेसच्या उमेदवार प्रियंका जितेंद्र मोघे आघाडीवर असून, भाजपाच्या ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके दुसऱ्या क्रमांकावर होत्या. वृत्त लिहेपर्यंत भाजपाच्या प्रियदर्शनी उईके आघाडीवर आहेत.

नगराध्यक्षपदासाठी एकूण नऊ उमेदवार रिंगणात होते. आतापर्यंतच्या आकडेवारीनुसार काँग्रेसच्या प्रियंका मोघे यांना ३,९५२ मते मिळाली असून, भाजपाच्या प्रियदर्शनी उईके यांना ३,२७४ मते मिळाली आहेत. शिवसेना (शिंदे)च्या तेजस्विनी राजू चांदेकर यांना ६९७, बसपाच्या मनिषा तिरणकर यांना ७५३ मते मिळाली आहेत. इतर उमेदवारांना मर्यादित मते मिळाली असून नोटाला ९६ मते पडली आहेत.

नगरसेवक पदासाठी ५८ जागांसाठी एकूण २९९ उमेदवार मैदानात होते. यामध्ये २५९ उमेदवार विविध राजकीय पक्षांचे, तर ४० अपक्ष उमेदवार होते. महिला उमेदवारांची संख्या १४६, तर पुरुष उमेदवार १५३ होते. अपक्षांमध्ये १५ महिला व २५ पुरुष उमेदवारांचा समावेश होता.

प्रभाग क्रमांक १ 'अ' मधून भाजपाचे श्रीकृष्ण कांबळे यांनी २,२५६ मते मिळवत काँग्रेसचे कपिल लांजेवार यांचा पराभव केला. प्रभाग १ 'ब' मधून काँग्रेसच्या वनिता बडे विजयी झाल्या. प्रभाग क्रमांक २ 'अ' मध्ये काँग्रेसच्या सविता अत्तरसिंग चव्हाण यांनी विजय मिळवला, तर २ 'ब' मधून वंचित बहुजन आघाडीचे आनंद गायकवाड विजयी झाले. प्रभाग क्रमांक ३ 'अ' मध्ये मीना मसराम, तर ३ 'ब' मधून अश्विन बोपचे यांनी विजय मिळवला.



मतमोजणी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत सुरू राहणार असून, अंतिम निकालानंतर नगराध्यक्षपदाचा निर्णय स्पष्ट होणार आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मतमोजणी केंद्रावर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. निकाल ऐकण्यासाठी राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे.

## त्रिंबक पाटील यांची जिल्हा बँक प्रतिनिधीपदी निवड

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**उमरखेड :** तालुक्यातील चालगणी ग्रामविकास विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या प्रतिनिधी निवडीची प्रक्रिया शनिवारी पार पडली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने सहकारी संस्था गटातून मतदार प्रतिनिधी नेमण्याची राज्यभर प्रक्रिया सुरू असताना, या सोसायटीने गुप्त मतदानाद्वारे ही निवड केली.

संस्थेच्या एकूण १२ सदस्यांपैकी सर्वांनी मतदानात सहभाग घेतला. काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा खरेदी-विक्री संघाचे माजी संचालक त्रिंबक पाटील यांना ९ मते मिळाली, तर त्यांच्या प्रतिस्पर्ध्याला केवळ ३ मते मिळाली. यामुळे त्रिंबक पाटील यांची जिल्हा बँकेच्या प्रतिनिधीपदी एकतर्फी निवड झाली.



मतदान प्रक्रियेत उत्तमराव कदम, विजय थोटे, बाबाराव कदम, रमेश काटे, जयंत काटे, रामदास नामदेव थोटे, भगवान टोमके, रामदास नारायण थोटे, शिलाताई नरवाडे, छायाबाई कदम, श्रीकांत कदम आणि प्रकाश खिल्लारे यांनी सहभाग घेतला.

निवडीनंतर गावातील रामेश्वर पाटील, सुरेश पाटील, डॉ. साहेबराव कदम, गणेशराव कदम, विनोद कदम, रामराव काटे, भिमराव थोटे, बापुराव पाटील, शिवाजी शिंदे महाराज, ज्ञानेश्वर शिंदे, प्रभाकर कदम, दिगंबर थोटे, गजानन थोटे, माधव वानखेडे, अनिल थोटे, मारोती टोमके, अरविंद दवणे, शिवाजी कदम, सुरेश थोटे, दिलीप कदम, पांडुरंग वानखेडे, उत्तम जाधव, सिद्धार्थ विणकरे, संतोष विणकरे, संदीप विणकरे, यशवंत नरवाडे, बाळू वंजारे, दत्ता वंजारे, श्रीरंग कदम, आनंदराव टोमके, सुनील कदम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी त्रिंबक पाटील यांचे जोरदार स्वागत केले.

ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे सचिव जीवन शेळके यांच्यासह देवसरी संस्थेचे अजिंक्य देवसरकर आणि लोहरा संस्थेचे विठ्ठल कदम यांनी सहकार्य केले.

## पैनगंगा नदीतून कृत्रिम बोटींद्वारे रेती तस्करी

### महसूल प्रशासनाच्या निष्क्रियतेने संताप

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**उमरखेड :** तालुक्यातील कारखेड येथील पैनगंगा नदीपात्रात कृत्रिम बोटींच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन सुरू असल्याचे उघड झाले आहे. प्रशासनाच्या नाकावर टिच्चून चाललेल्या या तस्करीमुळे हजारो ब्रास रेतीचा उपसा झाल्याचा अंदाज स्थानिकांनी व्यक्त केला आहे.

महसूल विभागाच्या निष्क्रियतेमुळे जनमानसात संतापाची लाट उसळली असून, विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तालुक्यात रेती घाटांच्या लिलाव प्रक्रियेत रखड झाल्याने तस्करांनी प्रशासनातील काही अधिकाऱ्यांच्या कथित संगनमताने हा गोरखधंदा उघडपणे चालविला आहे. कारखेड रेतीघाटावर कृत्रिम बोटींच्या मदतीने सुरू असलेल्या उत्खननाला संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती असूनही आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

गावातील सार्वजनिक ठिकाणी रेतीचे मोठे ढिगारे साठवले गेले आहेत. यामुळे कारखेडसह तालुक्यातील इतर नदी-नाल्यांवरूनही अवैध रेती उपसा सुरू असल्याचे चित्र आहे.



महागाव तालुक्यातील वाकोडी प्रकरणाचा विसर पडल्याने उमरखेडच्या महसूल प्रशासनाची झोपेचे सोंग घेतल्याची टीका होत आहे.

काही वर्षांपूर्वी उमरखेड व महागाव तालुक्यांसाठी स्वतंत्र उपविभागीय अधिकारी कार्यालय स्थापन करण्यात आले होते. मात्र, दोन्ही तालुक्यांत महसूल कामकाजात अनियमितता आणि अवैध गौण खनिज उत्खननाच्या वाढत्या तक्रारींमुळे हे कार्यालय नाममात्र राहिल्याची भावना व्यक्त होत आहे. जिल्हा प्रशासन याबाबत कोणती कार्यवाही करणार, याकडे पर्यावरणप्रेमी आणि शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

> ■ कारखेड प्रमाणेच पैनगंगा नदीपात्रातील इतर ठिकाणीही वारेमाप रेती उपसा सुरू आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासापोटी तरुण पिढी या अवैध व्यवसायात सक्रिय झाली आहे. रेती तस्करीमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीला चालना मिळत असल्याची खंत स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

## पाच हॉकी मुलींची विद्यापीठ संघात निवड

### आंतरविद्यापीठ स्पर्धेत अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**यवतमाळ :** बाबाजी दाते हॉकी अकॅडमी आणि आकाश चिकटे स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये कठोर सराव करणाऱ्या यवतमाळच्या पाच होतकरू महिला हॉकी खेळाडूंची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हॉकी संघात निवड झाली आहे. या मुली पुणे येथे २६ ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत होणाऱ्या आंतर विद्यापीठीय हॉकी स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

निवड झालेल्या खेळाडूंमध्ये वाधवानी महाविद्यालयाच्या आचल अवधूत आणि रियानी गाडेकर तसेच अमोलकचंद महाविद्यालयाच्या सानिका भरणे, गायत्री पुरी आणि सुहानी चाणेकर यांचा समावेश आहे. सध्या या सर्व खेळाडू अमरावती येथे १४ ते २३ डिसेंबर या कालावधीत सुरू असलेल्या सराव शिबिरात सहभागी होऊन तयारी करत आहेत. या यशाबद्दल वाधवानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत चतुर, प्राचार्य डॉ. राजेश भांडवलकर, शारीरिक शिक्षण संचालक किशोर तायडे, संजय



पंढरीवाड, सौ. नीतू शेंडे, विशुद्ध विद्यालयाचे संस्थापक विनायक दाते, दाते कॉलेजचे प्राचार्य डॉ. अमोल देशमुख, माजी प्राचार्य डॉ. राजेंद्र क्षीरसागर यांच्यासह यवतमाळ जिल्हा हॉकी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. निवड झालेल्या मुलींनी हे यश आपल्या प्रशिक्षिका तथा हॉकी महाराष्ट्राच्या उपाध्यक्ष आणि यवतमाळ जिल्हा हॉकी असोसिएशनच्या सचिव मनीषा आखरे यांचे मार्गदर्शन व आई-वडिलांच्या प्रोत्साहनाला दिले आहे. यवतमाळच्या हॉकी क्षेत्रासाठी हे मोठे यश मानले जात आहे. स्पर्धेत या मुली चमकदार कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

## पारवा पोलीस वसाहत जीर्ण; मोकाट जनावरे, साप-विंचूंचा वावर

### पोलीस महासंचालक व प्रशासनाकडून उपाययोजनांची अपेक्षा

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**नारायण गटलेवार**

**पारवा (घाटंजी) :** पारवा पोलीस स्टेशन येथील पोलीस कर्मचारी वसाहत सध्या पूर्णतः जीर्ण अवस्थेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. वसाहतीतील मोजक्याच खोल्या वापरण्यायोग्य राहिल्या असून, अनेक पोलीस कर्मचाऱ्यांना गावात किरायाच्या खोल्यांमध्ये राहावे लागत आहे. या परिस्थितीमुळे पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

वसाहतीच्या मागील बाजूस मोठ्या प्रमाणावर मोकाट जनावरे व भटकी कुत्री वावरताना दिसतात. मागील पावसाळ्यात या परिसरात मोठ्या प्रमाणावर झाडे, काटेरी झुडपे वाढली असून, साप व विंचू आढळून येत असल्याने कर्मचाऱ्यांना मागील बाजूने जाण्याची भीती वाटत




आहे. वसाहतीचा मागचा भाग पूर्णतः मोडकळीस आला असून, त्यालगतची तार कंपाउंड वॉल अनेक ठिकाणी तुटलेली आहे.

या धोकादायक परिस्थितीत पोलीस कर्मचारी अक्षरशः जीव मुठीत धरून राहात असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे पोलीस स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वारावर असलेले नावफलक आजही वाकलेल्या अवस्थेत दिसून येत असून, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ यांचे या बाबीकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे.

पारवा पोलीस स्टेशन अंतर्गत तब्बल १०२ गावांचा कारभार पाहावा लागत असून, मनुष्यबळ अपुरे असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत आहे. अपुऱ्या सुविधा, जीर्ण वसाहत आणि वाढता ताण यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचे मनोबल खचण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या सर्व बाबींची पोलीस महासंचालक व संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, वसाहतीची दुरुस्ती करावी, आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच पारवा पोलीस स्टेशनला अधिक मनुष्यबळ मंजूर करावे, अशी मागणी पारवा परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## शेत खाली करण्यासाठी पोलिस शेतात

### पोहरकर कुटुंबाची एसपींकडे तक्रार

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**यवतमाळ :** उमरखेड तालुक्यातील सोईट (महागाव) येथे जमीन विवादातून निर्माण झालेल्या तणावात बिटरगाव पोलिसांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पोहरकर कुटुंबाने १९ डिसेंबर रोजी पोलिसांनी शेतात येऊन धमकावल्याची तक्रार जिल्हा पोलिस अधीक्षक तसेच उमरखेड उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याकडे केली आहे.

या कुटुंबाचा दावा आहे की, ओम खोपे यांच्यासह काही व्यक्तींनी त्यांना मारहाण केली होती. त्यानंतर बिटरगाव पोलिस ठाण्यात कारवाईसाठी विलंब झाल्याने त्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन तक्रार नोंदवली होती.

मात्र, त्यानंतरही पोलिस शेत खाली करण्यासाठी दबाव टाकत असल्याचा आरोप पोहरकर कुटुंब करत आहे.

जमीन खरेदी-विक्रीचा वाद सध्या न्यायालयात प्रलंबित आहे.



न्यायालयाचा निकाल प्रतिकूल आल्यास शेत रिकामे करण्यास तयार असल्याचे पोहरकर कुटुंबाने स्पष्ट केले आहे. तरीही पोलिसांकडून सतत धमक्या मिळत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. १९ डिसेंबर रोजी दुपारी एमएच २९ बीपी ७०२१ या क्रमांकाच्या पोलिस वाहनाने शेतात आगमन झाल्याची माहिती देण्यात आली आहे.

पोहरकर कुटुंबाने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून न्याय मिळवून देण्याची विनंती पोलिस अधिकाऱ्यांना केली आहे. जमीन विवादातील दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून योग्य ती कारवाई अपेक्षित आहे.

## ढाणकीत नगराध्यक्षपदासाठी मशाल पेटली

### प्रस्थापित उमेदवारांना मतदारांचा धक्का; शहरात समिश्र कौल

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**ढाणकी :** बहुचर्चित असलेल्या ढाणकी नगरपंचायतच्या नगराध्यक्ष व 17 नगरसेवक पदाचे निकाल आज घोषित करण्यात आले. यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना उ बा ठा गटाच्या अर्चनाताई सुंदरकांता वासमवार यांनी बाजी मारली त्यांना एकूण 3200 मतदान झाले. त्यानंतर भाजपाच्या उमेदवार शिवनंदा रमेश गायकवाड यांना 2649 , काँग्रेसच्या उमेदवार रेखा रमेश गायकवाड 2612, शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार आरती राजू कलाले यांना 1883 मते मिळाली.

अतिशय चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीमध्ये शिवसेना उबाठाला फक्त नगराध्यक्ष पदावरच समाधान मानावे लागले त्यांचा



एकही नगरसेवक पदाचा उमेदवार निवडून आला नाही. त्याचप्रमाणे भाजपाला एकूण सात जागेवर समाधान मानावे लागले. काँग्रेसची पीछेहाट या निवडणुकीमध्ये सुद्धा दिसून आली . काँग्रेसच्या वाट्याला फक्त दोनच जागा निवडून आणता आल्या. विशेष म्हणजे ढाणकी च्या राजकारणात प्रथमच एमआयएम या पक्षाने एन्ट्री घेत एकूण तीन जागा निवडून आणल्या. हा काँग्रेससाठी मोठा धक्काच म्हणावा लागेल. शिंदे साठी गटाने सुद्धा प्रथमतःच निवडणूक लढवत एकूण तीन उमेदवार निवडून आणले. तसेच प्रभाग क्रमांक 14आणि 1 5 मध्ये मतदारांनी राजकीय पक्षांना नाकारत अपक्ष उमेदवार निवडून दिले. नगरपंचायत निवडणुकीमध्ये यावेळेस मतदारांनी प्रस्थापितांना नाकारले. प्रभाग क्रमांक चार मधून काका पुतण्याच्या लढतीमध्ये पुतण्याने बाजी मारली. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बाळासाहेब चंद्रे पाटील यांना भाजपाचे उमेदवार व त्यांचे पुतणे मल्हार महेश चंद्रे यांनी टक्कर देत त्यांचा पराभव केला. त्याचप्रमाणे माजी उपनगराध्यक्ष जहीर जमीनदार, यांना सुद्धा पराभवाचे तोंड बघावे लागले.

एकूणच अतिशय चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीमध्ये मतदारांनी समिश्र कौल दिलेला आहे. बहुचर्चित असलेल्या प्रभाग क्रमांक 17 मध्ये शिंदे गटाचे उमेदवार दत्त दिगंबर वानखेडे यांनी भाजपाचे उमेदवार नरेश गंदेवार यांचा पराभव केला. दत्त दिगंबर वानखेडे यांच्या विजयाने शिवसेना शिंदे गटाचे मनोबल वाढलेले आहे.

## कर्मयोगी संत गाडगे बाबा यांना अभिवादन



प्रतिनिधी २१ डिसेंबर

**घाटंजी :** बाबसाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पारवा येथील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राष्ट्रसंत कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. जगदीश हेंडवे आणि डॉ. संदीप अग्रवाल राष्ट्रीय सेवा योजनासह कार्यक्रम अधिकारी यांच्या नेतृत्वात संपन्न झाला.

या सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे यांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यानंतर उपस्थित प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा यांना अभिवादन केले. यानंतर महाविद्यालय परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

महाविद्यालय परिसरात पिंपळ, कडूलिंब, मोह आणि आंबा इत्यादी वृक्षाची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता दिलीप इंगोले, राजू नगनुरवार, स्वामी गज्जलवार, राहुल आडे यांनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि. २१ डिसेंबर २०२५

# विजयी भव ! वाशीम



बसस्थानका जवळील कोरोनेशन क्लबसमोर मतमोजणी जाहीर झाल्यानंतर जल्लोष करतांना कार्यकर्ते



बसस्थानका जवळील कोरोनेशन क्लबसमोर मतमोजणी दरम्यान चोख बंदोबस्त करताना पोलिस कर्मचारी .















## रिसोडमध्ये भाजप, मालेगावात शिंदे सेना...

# मंगरूळपीरमध्ये राकाँ.चे नगराध्यक्ष !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात पार पडलेल्या नगर पालिका निवडणुकीचे निकाल घोषीत झाले असून रिसोडमध्ये भाजपाचे भगवानराव क्षीरसागर, मालेगावमध्ये शिंदे सेनेचे ओमप्रकाश खुरसडे, मंगरूळपीरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे अशोक परळीकर आणि कारंजा लाड नगर पालिकेत एमआयएमच्या फरीदाबानो महमद शफी पुंजानी आघाडीवर असल्याचे समजते.वाशीम नगराध्यक्ष पदाची मतमोजणी सुरू असून वृत्त लिहिपर्यंत भाजपाचे अनिल केंदळे आघाडीवर असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.







रिसोड नगर पालिकेत नगराध्यक्ष पदासाठी भाजपाचे भगवानराव क्षीरसागर यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे बाळासाहेब देशमुख यांच्यात जोरदार लढत झाली. या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत भाजपाचे भगवानराव क्षीरसागर विजयी झालेत.

तर मालेगाव नगर पंचायतीमध्ये शिंदे सेनेचे ओमप्रकाश खुरसडे यांनी विजय प्राप्त केला. मंगरूळपीर नगर पालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे अशोक परळीकर यांनी केंद्रात व राज्यात सत्ताधारी असलेल्या आणि वाशीम मतदार संघाचे भाजपचे आमदार श्याम खोडे यांच्या प्रतिष्ठेच्या असलेल्या भाजपाचे उमेदवार डॉ. दिलीप रत्नपारखी यांचा पराभव करून आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.

कारंजा पालिकेत एमआयएमच्या फरीदाबानो पुंजानी आणि भाजपाच्या निशा गोलेच्छा यांच्यामध्ये अटितटीची परिस्थिती दिसत आहे. वाशीम नगर पालिकेचे भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अनिल केंदळे हे प्रतिस्पर्धी उबाठाच्या उमेदवार रेखा मापारी यांच्या पेक्षा आघाडीवर असल्याचे समजते. वाशीमची मतमोजणी प्रक्रिया अद्यापही सुरू असून वाशीम आणि कारंजा पालिकेच्या निकालाची जिल्ह्यातील नागरिकांना प्रतिक्षा लागल्याचे दिसत आहे.









सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

## पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा जल्लोष

**अकोला :** जिल्ह्यात ५ नगरपरिषदांसह एका नगर पंचायतसाठी रविवारी सकाळी १० वाजेपासून मत मोजणीला सुरुवात झाली. ठिकठिकाणी मतमोजणी केंद्राबाहेर राजकीय पक्षाचे कार्यकर्ते तसेच नागरिकांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून आली. विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी मोठ्या प्रमाणात जल्लोष केला. गुलाल उधळण्यात आला, मिठाई वाटण्यात आली तसेच मंगलवाद्यांच्या गजरात विजयी मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी जल्लोष साजरा झाला.

# अकोला जिल्ह्यातील उमेदवारांचा विजयी जल्लोष



अकोट येथे विजयी जल्लोष

## हिवरखेड मध्ये भाजपच्या नगराध्यक्ष

**हिवरखेड :** नगरपरिषद हिवरखेड सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये आज नगराध्यक्ष म्हणून भाजपच्या उमेदवार सुलभा रमेश दुतोंडे ह्या विजय झाल्या असून इतर दहा प्रभागात विजयी उमेदवार असे आहेत

प्रभाग क्रमांक

१अ मधुन भाजपच्या वंदना राजेश वानखडे
१ब मधून भाजपचे रोशन खा रसूल खा
२अ मधून वंचित बहुजन आघाडीच्या सविता सुनील इंगळे
२ब मधून एम आय एम पक्षाचे सुभेदार खान आजम खान
३अ मधून। भाजपच्या प्रतिभा वीरेंद्र येऊन
३ब मधून शिवसेनेचे रामेश्वर पुंडलिक हागे
४अ मधून शिवसेनेच्या शितल प्रमोद पोके
४ब मधून शिववसेने चे ऋषिकेश श्रीकृष्ण पंचबुद्धे
५अ मधून भाजपच्या प्रमिला रवींद्र मानकर
५ब मधून शिवसेनेची रवी मधुकर घुंगड
६अ मधून भाजपचे दीपक बाबन रायबोले
६ब मधून भाजपच्या अनिता रवींद्र वाकोडे
७अ मधून भाजपच्या वैशाली गणेश वानखडे
७ब मधून भाजपा चे अजित खा जमीर खा
८अ मधून भाजपच्या दिपाली संदीप इंगळे
८ब मधून भाजपचे वैभव रमेश गावंडे
९अ मधून भाजपचे प्रथमेश श्रीराम नाठे
९ब मधून शिवसेनेच्या जयश्री महादेव गावंडे
१०अ काँग्रेस पक्षा तर्फे नदिया अंजुम नसेल खान
१०ब मधून काँग्रेस च्या रुबी नाज अब्दुल सलमान
हे उमेदवार विजयी झाले आहेत.



हिवरखेड येथे विजयी जल्लोष करताना कार्यकर्ते



तेल्हारा येथे विजयाचा गुलाल उधळताना



बाळापूर येथे ढोल ताशांच्या गजरात विजयाचा आनंद साजरा करताना समर्थक



बार्शीटाकळी येथे मतमोजणी केंद्राबाहेर झालेली गर्दी



मूर्तिजापूर मतमोजणी केंद्राबाहेर झालेली गर्दी



बार्शीटाकळी येथे मतमोजणी दरम्यान अकोला शहर उप अधीक्षक सुदर्शन पाटील यांनी पाहणी केली

## अकोट येथील विजयी नगरसेवक

**अकोट :** प्रभाग क्रमांक ३ चे नगरसेवक पदाचे उमेदवार आफ्रिन अंजुम शरीफदिन mim विजयी व अब्दुल अकबर अब्दुल नासिर प्रहार विजयी. प्रभाग क्रमांक ५ चे मो,आरिफ अब्दुल मारुफ घड्याळ विजयी व सलमा बेगम मो, खालिद घड्याळ विजयी. प्रभाग क्रमांक ६ चे सौ इंगोले शिंदे गट डाबेराव भाजपा विजयी अकोट येथे प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक पदाचे उमेदवार वंचीतच्या इम्रान व कांबळे ताई विजयी. प्रभाग १२ चे नगरसेवक पदाचे निलेश दिलीप नवघरे व शुभांगी टेमझरे भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विजयी. प्रभाग प्रभाग १३ चे नगमा अंजुम अझर शेख व आसाम परवेज मो. परवेझ दोन्ही काँग्रेस उमेदवार विजयी. प्रभाग १४ चे प्रथमेश संजय बोरोडे भारतीय जनता पार्टी व सौ. जुनघरे राष्ट्रवादी शरद पवार गट हे उमेदवार विजयी,

## मूर्तिजापूर विजयी नगरसेवक

मूर्तिजापूर : प्रभाग ५ मध्ये निजामुद्दीन इस्लामोद्दीन वंचित व पटेल फहेमेदाबी कलीमोद्दीन वंचित विजयी, प्रभाग ७ मध्ये पंकज चंद्रशेखर कांबे भाजप, सोनल मुकेश काळपांडे भाजप विजयी. प्रभाग ८ मध्ये ममता कैलास महाजन अपक्ष व भुपेंद्र मारोती आप्पा पिंपळे विजयी. प्रभाग ६ मध्ये प्रथमेश संजय बोरोडे भाजप, सौ. जुनघरे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष विजयी. लखन मिलांदे भाजप, बानो इब्राहिम राकाँ पवार विजयी.


## बार्शीटाकळी येथील विजयी नगरसेवक

बार्शीटाकळी : वार्ड क्रमांक दहा मध्ये रमेश मनोहर वाटमारे बीजेपी तर वार्ड क्रमांक ११ मध्ये आम्रपाली नाक्षण इंगोले अपक्ष वार्ड क्रमांक १२ मध्ये मुमताज मोहम्मद सिद्धी काँग्रेस हे विजयी झाले आहे बार्शीटाकळी नगरपंचायत मध्ये वार्ड क्रमांक १३ रफिया खातून अन्सार उल्ला खान इंडियन नॅशनल काँग्रेस हे विजय झाले आहे वार्ड क्रमांक १४ मध्ये मोहम्मद साफिया बेगम अब्दुल रफिक नॅशनल काँग्रेस पार्टी हे विजय झाले आहे. वार्ड क्रमांक १५ मोहम्मद फरान शेख जमीन एम आय एम मधून विजय वार्ड क्रमांक १६ शेख साधी शेक आम्ही वंचित बहुजन आघाडी तर वार्ड क्रमांक १७ मध्ये सय्यद अब्राह सय्यद वंचित बहुजन आघाडी विजय झाले आहे

## नीट जेईईला पर्याय काय ? एम स्क्वेअर ट्यूटोरियल तर्फे मार्गदर्शन

### ♦ २४ डिसेंबर रोजी खंडेलवाल भवनात सायंकाळी ६.३० ते ९ वाजेपर्यंत सेशन

प्रतिनिधी २१ डिसेंबर




**अकोला :** ९९ टक्के पालकांचा कल आपल्या मुलांनी नीट, जेईई करावे याकडे असतो. परंतु आज सीए, सीएस, डेटा सायन्स आणि डिजिटल मार्केटिंग यांसारख्या क्षेत्रांत मोठी संधी आहे. याच विषयावर एम स्क्वेअर ट्यूटोरियल द्वारे विशेष सत्र आयोजित केले जात आहे. २४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० ते ९ वाजेपर्यंत खंडेलवाल भवनात आयोजित सत्राचा विद्यार्थी आणि पालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे

सध्याच्या काळात नीट, जेईई ला देखील पर्याय असू शकतात. त्याविषयी अभियंता मयंक थानवी, सीए अंकित अग्रवाल, प्रा. राजेश जोध हे तज्ज्ञ मार्गदर्शक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. केवळ पदवी पेक्षा कौशल्य आणि योग्य दिशा महत्त्वाची आहे. स्वतःची आवड ओळखून यशाची नवीन शिखरे सर करा, कारण एक परीक्षा तुमचे भविष्य ठरवू शकत नाही असे थानवी आणि अग्रवाल यांचे मत आहे. खंडेलवाल भवनात आयोजित विशेष सत्रासाठी ९३७०३३५४५५ या क्रमांकावर संपर्क साधा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## भारतीय जनता पक्षावर जनतेचा गाढा विश्वास : चंद्रशेखर बावनकुळे

प्रतिनिधी २१ डिसेंबर

**अकोला :** अकोला महानगर सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना महानगरपालिका निवडणुकीत जनता निवडून देणार आहे. कार्यकर्त्यांनी महायुतीच्या कामाचा जोगवा मागून केंद्र आणि राज्य सरकार तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या कामांचे पत्रक काढून घरोघरी पोहोचवा. कार्यकर्त्यांची भावना समजणारा भारतीय जनता पक्ष असून, कार्यकर्त्यांच्या बळावर आज इतर पक्षांचे कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करू इच्छितात ही पक्षाची लोकप्रियता आणि जनतेचा विश्वास असल्याचे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र निवडणूक प्रभारी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

### ♦ सिटी स्पोर्ट्स येथे पदाधिकाऱ्यांची संवाद बैठक



स्थानिक सिटी स्पोर्टस येथे भाजपा पदाधिकाऱ्यांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी महानगर अध्यक्ष जयंत मसने होते. व्यासपीठावर भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, विजय अग्रवाल, संतोष शिवरकर, किशोर पाटील, वैशाली शेळके, अर्चना मसने विराजमान होते. चंद्रशेखर बावनकुळे यांनी विजयाचा २१ सूत्री मंत्र, वेगवेगळे कार्यक्रम देऊन महानगरपालिका जिंकण्याचा मार्ग मायक्रो प्लॅनिंग करण्याचे निर्देश दिले. जनता देवेंद्र फडणवीस आणि नरेंद्र मोदी सरकारच्या कामकाजावर खुश आहे. नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये भाजपाला यश मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

कार्यकर्त्यांच्या बळावर भाजप देशात सर्वात मोठा पक्ष असून, वेगवेगळे कार्यक्रम ३१ डिसेंबरपर्यंत करण्याची माहिती त्यांनी दिली. भारतीय जनता पक्ष प्रत्येक प्रभागात महिला तसेच प्रभाग न्याय मेळावे घेऊन सामाजिक समीकरणासोबत समाजातील वेगवेगळ्या घटकांशी संवाद साधण्यासाठी कार्यकर्त्यांची टीम कार्यरत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी यांच्या सभा

◆ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्यातील इतर नेत्यांच्या सभा होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. अकोला महानगराचे विशाल संमेलनसुद्धा घेण्याचे व शहरातील वेगवेगळ्या भागांतील नागरिकांशी संवाद साधण्याचे त्यांनी सांगितले. खासदार अनुप धोत्रे यांनी विजयासाठी असलेले मंत्र सांगून कार्यकर्ता महत्त्वाचा असून, कार्यकर्त्यांनी विजयाच्या दृष्टीने कामाला लागावे असे आवाहन केले.

### महायुती व्हावी यासाठी प्रयत्न करणार : आ. सावरकर

◆ महायुती व्हावी ही प्रदेश तसेच स्थानिक नेत्यांची इच्छा असून, या दृष्टीने बोलणे सुरू आहे. लवकरच महायुती जनतेसमोर येईल. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जबाबदारीने लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीप्रमाणे यश प्राप्त करण्यासाठी तसेच अकोला महानगरात झालेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमासंदर्भात सांगितले. अकोला शहरातील २० प्रभागांपैकी १६ प्रभागांमध्ये पत्रक वाटप झाल्याचे सांगून कार्यकर्ता हा निवडणुकीसाठी सज्ज असल्याचे आ. रणधीर सावरकर यांनी सांगितले संचालन गिरीश जोशी तर आभार प्रदर्शन जयंत मसने यांनी केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK